# शाश्वत ग्रामीण विकास
# तथा
# भारतीय महिलांची स्थिती



:: मुख्य संपादक ::
**प्राचार्य डॉ. व्ही.एल.एरंडे**

:: संपादक ::
**नरेश व्ही. पिनमकर**

:: सहयोगी संपादक ::
**डॉ.ए.बी. धालगडे   डॉ. एस.एस.देवनाळकर   डॉ.व्ही.पी.सांडूर**

Scanned by TapScanner

१५. महिला सबलीकरणाच्या विविध शासकीय योजना : प्रा.[illegible]
१६. महिला सबलीकरण काळाची गरज : प्रा.बाबुराव [illegible]
१७. महिला सबलीकरण व स्थानिक स्वराज्य संस्था
: डॉ.स्मिता [illegible]
१८. वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांची सद्यस्थिती आव्हाने व पुनर्वसन
: प्रा. सय्यद एस. आय.
१९. भारतीय महिला शेतमजूरांच्या सामाजिक समस्या : प्रा. बी.बी. पवार
२०. स्त्री भ्रूणहत्या : एक सामाजिक कलंक
: प्रा. राणी [illegible]
२१. जागतिकीकरण : भारतीय स्त्रीची बदलती भूमिका : विश्वांभर [illegible]
२२. शाश्वत ग्रामीण विकासातील सामाजिक समस्या आणि उपाय : प्रा.डॉ.[illegible]
२३. ग्रामीण भागातील महिलांचे आरोग्य आणि पायाभूत सुविधा : डॉ. शंकर [illegible]
२४. वर्तमान भारतीय परिस्थितीत स्त्री हिंसाचार व महिला संरक्षणाच्या कायदेशीर तरतुदी
: प्रा.डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे
२५. वर्तमान भारतीय परिस्थितीत महिला सबलीकरणाची वाटचाल
: प्रा.सतीश गंगाराम ससाणे
२६. वर्तमान भारतीय परिस्थितीत महिलांची राजकीय आर्थिक स्थिती
: प्रा. पाटील आशा सुभाषराव
२७. वर्तमान भारतीय परिस्थितीत महिलांची सामाजिक व आर्थिक स्थिती
: डॉ. एस.एस. देवनाळकर
२८. भारतीय राजकारणातील महिलांचा सहभाग एक आढावा : डॉ. एस.डी. सावंत
२९. भारतीय-राजकारणातील महिलांची स्थिती
: प्रा.बदनाळे शिवरुद्र शरणप्पा, प्रा. दाताळ डी. व्ही.
३०. आदिवासी विकासाच्या विविध योजना : अपेक्षा आणि वास्तव
: डॉ. भास्कर श्रा. गायकवाड
३१. महिलांचा राजकीय सहभाग वर्तमान स्थिती : डॉ. गोविंद येडले
३२. र. धों. कर्वे यांची संततिनियमन चळवळ आणि स्त्री आरोग्याची भुमिका
: डॉ. बेंजलवार सुभाष गणपतराव, श्री माने दत्तात्रय गुंडाजी
३३. वर्तमान भारतीय परिस्थितीत महिलांची सामाजिक आर्थिक स्थिती
: प्रा.कांबळे शिवाजी ईरबा
३४. महिला सबलीकरण: अडथळे व उपाय : प्रा. पवार अविनाश विलासराव

Scanned by TapScanner

## स्त्री भ्रूणहत्या : एक सामाजिक कलंक

**प्रा. राणी जगन्नाथराव जाधव**
सहाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख
गृहविज्ञान विभाग
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर गढी, ता. गेवराई
जि. बीड.

**गोषवारा (Abstract) :**

भारतात दरवर्षी जवळजवळ ५ दशलक्ष गर्भपात होतात व गर्भपाताच्या वेळी हजारो महिला मृत्यूमुखी पडतात. मुलगी म्हणजे परक्याचे धन ही भावना आजही समाजामध्ये पक्की रूजलेली आहे. मुलगा हाच आपल्या वंशाचा दिवा आहे ही धारणा अशिक्षित समाजासह शिक्षण व सुबत्ता असणाऱ्या समाजातही बऱ्याच अधिक प्रमाणात आहे. स्त्री भ्रूणहत्या ही तर स्त्री जन्माला येण्याअगोदरच तिच्यावर केलेली हिंसा होय. भारतामध्ये १९०१ मध्ये स्त्री पुरूष गुणोत्तराचे लिंग प्रमाण ९७२ होते. १९२१, १९५१ मध्ये ९४६, १९७१ मध्ये ९३०, १९९१ मध्ये ९२७, २००१ मध्ये ९३३ व २०११ मध्ये ९४० असे लिंग प्रमाण आहे. राज्याचा विचार केला असता पंजाबमध्ये ८९३, चंदीगढमध्ये ८१८, हरियाणामध्ये ८७७ तर भारताची राजधानी दिल्लीमध्ये ८६६ अशा प्रकारे संपन्न राज्यामध्येही मुलींची संख्या चिंताजनक आहे. महाराष्ट्राचा विचार केला तर १९९१ साली दर हजारी पुरूषामागे स्त्रियांचे प्रमाण ९४६, २००१ मध्ये ९१३ तर २०११ मध्ये ९२५ होते. महाराष्ट्रातील बीड जिल्हा स्त्रीभ्रूण हत्येसाठी कुप्रसिध्द झालेला आपण मागील काही वर्षांत पाहिलेला आहे. कोणताही समाज निरोगी राहायचा असेल तर स्त्री-पुरूषांचे प्रमाण समान असणे आवश्यक आहे.

आज कोणत्याही देशाची प्रगती मोजताना देशातील स्त्रियांचे प्रमाण व स्थान हे महत्त्वाचे मानले जाते. समाजातील स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी विविध कायदेशीर तरतुदी केल्या असल्या तरीदेखील मुलींच्या संख्येत फारशी वाढ झालेली आढळून आलेली नाही. स्त्रीभ्रूण हत्येला अनेक सामाजिक, आर्थिक व मानसिक कारणे कारणीभूत आहेत. भविष्यामध्ये स्त्रीभ्रूण हत्येचे समाज जीवनावर अनेक दूरगामी परिणाम दिसून येतील. अविवाहित तरूणांचे प्रमाण वाढेल, सामाजिक आरोग्य धोक्यात येईल, योग्य वधू मिळणं कठीण होईल, स्त्रियांवरील अत्याचारात वाढ होईल. अशा प्रकारच्या अनेक समस्या निर्माण होतील त्यामुळे या समस्येच्या निराकारणासाठी राबविल्या जाणाऱ्या विविध शासकीय उपक्रम व योजना यांची काटेकोरपणे अमंलबजावणी समाजातील सर्व स्तरातून होणे आवश्यक आहे व समाजाची मानसिकता बदलणे अत्यंत आवश्यक आहे.

**प्रस्तावना :**

आपल्या भारतात पुरातन काळी स्त्रीला अत्यंत आदराचे स्थान होते. हिंदु धर्मात स्त्रीला शक्तीरूप मानले जाते. महाकाली, महालक्ष्मी महा सरस्वती या रूपात प्राचीन काळापासून तिची पूजा अर्चा केली जात आहे. तसेच विविध ग्रामदेवता व कुलदैवताच्या मातेच्या रूपात आजही मोठ्या उत्साहाने व भक्तीभावाने महोत्सव साजरे केले जातात. अनेक



Scanned by TapScanner

पौराणिक कथामध्ये भारतीय संस्कृतीत स्त्रियांचा पुरूषांइतकाच नव्हेतर त्यांच्यापेक्षा उच्च दर्जा मान्य केलेला आहे. वेदकाळात स्त्रियांना श्रेष्ठत्वाचे स्थान प्राप्त झाले. याचे कारण धर्मकारण, ज्ञान-विज्ञान, समाजकारण इत्यादीमध्ये तिला पुरूषाप्रमाणे प्राधान्य होते. घराला घरपण यावे, मुलांना चांगले संस्कार व्हावीत किंवा चांगली सुदृढ बालके जन्माला यावीत म्हणून तिच्यावर उत्तम संस्कार करून तिला उत्तमोत्तम शिक्षण घेण्याचा अधिकार होता. तसेच मुलांना उत्तम शिक्षण देणे जेवढे स्त्रियांना जमते तेवढे पुरूषांना जमत नाही. त्यामुळे आईला वडिलांपेक्षा नव्हे तर गुरूपेक्षा श्रेष्ठ स्थान वेदकाळात होते. यानंतर मनुस्मृतीच्या काळात स्मृतीकाराने स्त्रियांवर विविध प्रकारची बंधने लादली. तिचे सर्व अधिकार व स्वातंत्र्य नष्ट करण्यात आले. स्त्रीचे लहानपणी पित्याने तरूणपणी पतीने व म्हतारपणी पुत्राने रक्षण करावे. तिला कोणत्याही प्रकारचे स्वातंत्र्य देवू नये. स्त्री ही बेईमान, व्याभिचारी व दुराचारी असते इत्यादी विशेषणे लावून तिच्यावर विविध अनिष्ठ रूढी परंपरा लादल्या गेल्या. १२ व्या शतकानंतर तिचे जीवन अधिकच निम्न दर्जाचे झाले. सतीप्रथा, बालविवाह, केशवपन, पडदा पध्दती, दासी प्रथा अशा प्रथांनी तिला अधिकच बंदिस्त केले. तत्कालीन विविध समाजसुधारकांनी या कुप्रथा बंद करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. ब्रिटिशकाळात विविध कायद्यांच्या माध्यमातून या अनिष्ठ प्रथा बंद करण्यात आल्या. स्वातंत्र्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय राज्यघटनेच्या माध्यमातून महिलांचे जीवनमान उंचावण्यासाठी त्यांना विविध प्रकारचे अधिकार व स्वातंत्र्य बहाल केले. आधुनिक काळात विज्ञानामध्ये प्रचंड प्रमाणात प्रगती घडून आली. त्यामुळे मानवाने विकासासाठी त्याचा वापर करून घेतला. परंतु या वैज्ञानिक तंत्रज्ञानाच्या वापराचा दुरूपयोग करून गर्भजल परिक्षण करून स्त्रीभ्रूणाला जन्मापूर्वीच गर्भात मारले जात आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१) स्त्रीभ्रूण हत्येचा ऐतिहासिक आढावा.

२) लिंगगुणोत्तर प्रमाणाचा आढावा घेणे.

३) स्त्रीभ्रूण हत्येच्या कारणांचा अभ्यास करणे.

४) स्त्रीभ्रूण हत्येच्या समाजावरील दुष्परिणामांविषयी चर्चा करणे.

५) स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनांविषयी माहिती जाणून घेणे.

**गृहीतके :**

१) आर्थिक घटकांचा लिंगगुणोत्तर प्रमाणावर परिणाम होतो.

२) शैक्षणिक प्रगती व वैज्ञानिक प्रगती यामुळे या समस्येत वाढ होत आहे.

**तथ्य संकलन :**

प्रस्तुत शोधनिबंधाच्या तथ्य संकलनासाठी द्वितीयक साधनांचा उपयोग केलेला आहे. यासाठी विविध पुस्तके, मासिके, अहवाल, इंटरनेट, वर्तमानपत्रे, विविध तज्ञ व्यक्तींचे शोधनिबंध इत्यादींचा आधार घेण्यात आलेला आहे.

**स्त्रीभ्रूण हत्येचा ऐतिहासिक आढावा :**

भारतामध्ये मध्ययुगीन काळापासून ही क्रुरप्रथा अस्तित्वात असलेली आढळून येते. परंतु तेव्हाही प्रथा काही विशिष्ट जमातीपुरतीच मर्यादित होती. त्याकाळी राजपुत जमातीत मुलीचा विवाह अत्यंत खर्चिक होता आणि विवाह केला नाही तर सामाजिक अप्रतिष्ठा व धर्माज्ञेचे उल्लंघन होते. म्हणून कुटुंबामध्ये मुलगी जन्माला आल्याबरोबर तिला ठार



Scanned by TapScanner

मारण्यात येत असे. त्याचबरोबर काही माता मुलींच्या जन्मानंतर या नवजात मुलीला स्तनपान न करता किंवा स्तनांना अफू लावून तिला ठार मारीत असत. इ.स. १७८९ मध्ये वाराणशी प्रांतातील राजकुमर व राजबन्सी या जमाती ही कुप्रथा प्रचलित होती. इ.स. १७९५ व इ.स. १८०४ या साली झालेल्या कायद्याने बालहत्या खून आहे असे जाहीर करण्यात आले व स्त्रीभ्रूण हत्येवर प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. तरीदेखील राजस्थान, कच्छ आणि गुजरातमधील जडेन (झरिज) राजपुतात ही प्रथा चालुच होती ही प्रथा नष्ट करण्यासाठी त्या काळातील हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंगने प्रयत्न केले. तरीदेखील आजच्या आधुनिक व विज्ञानवादी युगातही या कुप्रथेचे झालेले सावित्रीकरण आपण पाहत आहोत.

### लिंगगुणोत्तर प्रमाणाचा आढावा :

स्त्रियांचे समाजातील प्रमाण वरचेवर घटत चालले आहे व त्याचे दुष्परिणाम आपणास आज दिसू लागले आहे. आजच काही जमातीमध्ये विवाहासाठी मुली मिळेनाशा झाल्या आहेत. साधारणपणे १९९१ पासून भारतामध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार दरहजारी पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९४५, २००१ मध्ये ९२७ तर २०११ साली ९४० होते. आपल्या महाराष्ट्र राज्यात १९९१ ते २०११ या कालावधीतील स्त्री- पुरूष लिंगगुणोत्तराचा जिल्हानिहाय आढावा घेतला असता सर्वात कमी प्रमाण बीड-८०१, त्यानंतर जळगाव ८२९, अहमदनगर-८२९, बुलढाणा-८४२, कोल्हापूर-८४५, जालना-८४७, औरंगाबाद-८४८, उस्मानाबाद-८५३, वाशिम-८५९, सांगली-८६२, परभणी-८६६, हिंगोली -८६८, सोलापूर-८७२, मुंबई-८७४, धुळे-८७६, सातारा-८८१, अकोला-९००, मुंबई उपनगर-९१०, सिंधुदुर्ग-९१०, ठाणे-९१८, रायगड-९२४, नागपूर-९२६, अमरावती -९२७, नंदुरबार-९३२, भंडारा-९३९, रत्नागिरी-९४०, गोंदिया-९४४, चंद्रपूर-९४५, गडचिरोली-९५३ असा लिंगगुणोत्तराचा क्रम लागतो. यावरून असे दिसून येते की, स्त्री-पुरूष लिंग गुणोत्तर विकसित जिल्ह्यात कमी व अविकसित मागासलेल्या जिल्ह्यात लिंगगुणोत्तराचे प्रमाण अधिक आहे.

### स्त्रीभ्रूण हत्येची कारणे :

अनेक समाज शास्त्रज्ञांनी व संशोधकांनी प्राचीन काळापासून ते आजच्या आधुनिक काळापर्यंतच्या स्त्रीभ्रूण हत्येच्या कारणांचा सविस्तर अभ्यास केलेला आहे. त्यातील काही कारणांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे आहे.

**१) हुंडा पध्दत :**

प्राचीन काळापासून आजही अनेक समाजात मुलींच्या लगनात भरमसाठ हुंडा द्यावा लागतो. त्यामुळे मुलगी म्हणजे ओझे. त्यामुळे तिला जन्माला घालून पुढे तिच्या विवाहाल हुंडा देण्यासाठी होणारी परेशानी टाळण्यासाठी व आपले धन वाचविण्यासाठी तिला गर्भातच मारले जाते.

**२) प्राचीन रूढी-परंपरा :**

आपल्या समाजात आजही मुलगा म्हणजे वंशाचा दिवा. म्हातारपणाचा आधार व मोक्षप्राप्तीचे साधन असतो ही परंपरा रूढ झालेली आहे. त्यामुळे मुलासाठी म्हणजेच पिढ्यानं-पिढ्या चालत आलेल्या प्रथा परंपरांचे पालन करण्यासाठी कित्येक मुलींची प्रसुतीपूर्व लिंग परिक्षण करून हत्या केली जाते.



Scanned by TapScanner

मारण्यात येत असे. त्याचबरोबर काही माता मुलींच्या जन्मानंतर या नवजात मुलीला स्तनपान न करता किंवा स्तनांना अफू लावून तिला ठार मारीत असत. इ.स. १७८९ मध्ये वाराणशी प्रांतातील राजकुमर व राजबन्सी या जमाती ही कुप्रथा प्रचलित होती. इ.स. १७९५ व इ.स. १८०४ या साली झालेल्या कायद्याने बालहत्या खून आहे असे जाहीर करण्यात आले व स्त्रीभूण हत्येवर प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. तरीदेखील राजस्थान, कच्छ आणि गुजरातमधील जडेन (झरिज) राजपुतात ही प्रथा चालुच होती ही प्रथा नष्ट करण्यासाठी त्या काळातील हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंगने प्रयत्न केले. तरीदेखील आजच्या आधुनिक व विज्ञानवादी युगातही या कुप्रथेचे झालेले सावित्रीकरण आपण पाहत आहोत.

**लिंगगुणोत्तर प्रमाणाचा आढावा :**

स्त्रियांचे समाजातील प्रमाण वरचेवर घटत चालले आहे व त्याचे दुष्परिणाम आपणास आज दिसू लागले आहे. आजच काही जमातीमध्ये विवाहासाठी मुली मिळेनाशा झाल्या आहेत. साधारणपणे १९९१ पासून भारतामध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार दरहजारी पुरूषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९४५, २००१ मध्ये ९२७ तर २०११ साली ९४० होते. आपल्या महाराष्ट्र राज्यात १९९१ ते २०११ या कालावधीतील स्त्री- पुरूष लिंगगुणोत्तराचा जिल्हानिहाय आढावा घेतला असता सर्वात कमी प्रमाण बीड-८०१, त्यानंतर जळगाव ८२९, अहमदनगर-८२९, बुलढाणा-८४२, कोल्हापूर-८४५, जालना-८४७, औरंगाबाद-८४८, उस्मानाबाद-८५३, वाशिम-८५९, सांगली-८६२, परभणी-८६६, हिंगोली -८६८, सोलापूर-८७२, मुंबई-८७४, धुळे-८७६, सातारा-८८१, अकोला-९००, मुंबई उपनगर-९१०, सिंधुदुर्ग-९१०, ठाणे-९१८, रायगड-९२४, नागपूर-९२६, अमरावती -९२७, नंदुरबार-९३२, भंडारा-९३९, रत्नागिरी-९४०, गोंदिया-९४४, चंद्रपूर-९४५, गडचिरोली-९५३ असा लिंगगुणोत्तराचा क्रम लागतो. यावरून असे दिसून येते की, स्त्री-पुरूष लिंग गुणोत्तर विकसित जिल्ह्यात कमी व अविकसित मागासलेल्या जिल्ह्यात लिंगगुणोत्तराचे प्रमाण अधिक आहे.

**स्त्रीभ्रूण हत्येची कारणे :**

अनेक समाज शास्त्रज्ञांनी व संशोधकांनी प्राचीन काळापासून ते आजच्या आधुनिक काळापर्यंतच्या स्त्रीभ्रूण हत्येच्या कारणांचा सविस्तर अभ्यास केलेला आहे. त्यातील काही कारणांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे आहे.

**१) हुंडा पध्दत :**

प्राचीन काळापासून आजही अनेक समाजात मुलींच्या लगनात भरमसाठ हुंडा द्यावा लागतो. त्यामुळे मुलगी म्हणजे ओझे. त्यामुळे तिला जन्माला घालून पुढे तिच्या विवाहाल हुंडा देण्यासाठी होणारी परेशानी टाळण्यासाठी व आपले धन वाचविण्यासाठी तिला गर्भातच मारले जाते.

**२) प्राचीन रूढी-परंपरा :**

आपल्या समाजात आजही मुलगा म्हणजे वंशाचा दिवा. म्हातारपणाचा आधार व मोक्षप्राप्तीचे साधन असतो ही परंपरा रूढ झालेली आहे. त्यामुळे मुलासाठी म्हणजेच पिढ्यानं-पिढ्या चालत आलेल्या प्रथा परंपरांचे पालन करण्यासाठी कित्येक मुलींची प्रसुतीपूर्व लिंग परिक्षण करून हत्या केली जाते.



Scanned by TapScanner

स्वागत व्हावे म्हणून महाराष्ट्रात "सावित्रीबाई फुले कन्या कल्याण योजना" राबविण्यात येत आहे. महिलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी "जननी सुरक्षा योजना", "नवसंजीवनी योजना", "सार्वत्रिक लसीकरण", "जीवनदायी आरोग्य योजना" तसेच आरोग्य विभागातर्फे "पहिले तार तिला" ही कल्पक योजना राबविण्यात येत आहे. तसेच सामाजिक न्याय विभागाची "कन्यादान योजना" आणि महिला बालविकास विभागाची "शुभमंगल सामुहिक विवाह योजना" महिलांसाठी राबविण्यात येत आहे.

**ब) स्त्रीभ्रूणहत्येला प्रतिबंध करणारे कायदे :**

१) १९७१ साली पहिला गर्भपात प्रतिबंधक कायदा करण्यात आला. या कायद्यानुसार स्त्रियांना गर्भपात करण्यास बंदी घालण्यात आली. फक्त जर अपवादाने गर्भवती स्त्रीच्या जीवाला कोणत्या कारणाने धोका निर्माण झाल्यास त्यावेही गर्भपात करण्याची परवानगी देण्यात आली.

२) १९७४ साली केलेल्या मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नंसी (एम.टीपी) या कायद्यानुसार गर्भस्थ शिशू हा असामान्य आहे किंवा कुटुंब नियोजन केल्यावरही गर्भधारणा राहिल्यास अशावेळी गर्भपात केल्यास गुन्हा ठरणार नाही. परंतु ही प्रक्रिया २० आठवड्याच्या आत होणे आवश्यक आहे.

३) स्त्रीभ्रूण हत्या राखण्यासाठी देशातील महाराष्ट्र पहिले राज्य आहे. जिथे प्रसुतीपूर्व, गर्भलिंग निवड गर्भलिंग ओळख थांबविण्यासाठी १९८८ साली महाराष्ट्र रेग्युलेशन ऑफ प्रिनेटल डायग्नोस्टिक टेक्नीक्स ॲक्ट हा कायदा लागू झाला. त्यानंतर राष्ट्रीय पातळीवर प्रसुतीपूर्व निदान तंत्र नियंत्रण कायदा २० सप्टेंबर १९९४ साली लागू झाला.

४) २००३ साली १९९४ च्या कायद्यात दुरूस्ती करून गर्भधारणापूर्व व प्रसुतिपूर्व गर्भलिंग निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा या नवीन कायद्याची निर्मिती करण्यात आली. या कायद्यानुसार गर्भलिंग चाचणी करण्यासंबंधी प्रत्यक्षरित्या व अप्रत्यक्षरित्या प्रसार करणे गुन्हा आहे. त्यासाठी वर्षापर्यंत कैद व १० हजार रूपयांपर्यत दंड होवू शकतो. गुन्हेगार नोंदणीकृत वैद्यकीय अधिकारी असल्यास खटल्याचा निकाल लागेपर्यंत त्यांची नोंदणी रद्द होईल व गुन्हा सिध्द झाल्यास प्रथमवेळेस ५ वर्षांसाठी व दुसऱ्या वेळेस नेहमीसाठी रद्द करण्यात येईल. तसेच महिलेला लिंग परिक्षणासाठी जबरदस्ती करणाऱ्या पुरूषाला किंवा स्त्रीला सुध्दा या कायद्याने शिक्षा केली जाते.

**मुल्यमापन :**

एकंदरीत आपल्या समाजात असणाऱ्या स्त्रियांच्या विविध समस्यांपैकी एक भीषण समस्या म्हणून स्त्रीभ्रूण हत्येचा उल्लेख करावा लागेल. स्त्रीभ्रूण हत्येच्या संदर्भात प्रत्येकाने गांभिर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. प्रत्येकाने आपल्या कुटुंबातील मुलीचा सन्मान केला तर समाजातील लोकही तिचा सन्मान करतील प्रत्येक पालकांनी मुली कुटुंबाचे ओझे नसून त्या घराचा अभिमान व शान आहेत असे वातावरण निर्माण करून त्यांना आपले जीवन फुलवण्याचे स्वातंत्र्य दिले पाहिजे. शासनाने वेळोवेळी केलेल्या कायद्यांची व मुलींच्या जन्माला प्रोत्साहन देणाऱ्य विविध शासकीय योजनांची माहिती जनसामान्यांपर्यंतत जास्तीत जास्त प्रसारित करणे आवश्यक आहे. स्त्रीभ्रूणहत्येला कारणीभूत असणाऱ्या विविध घटकांच्या बाबतीत योग्य ती उपाययोजना केली तर भविष्यातील स्त्रीभ्रूण हत्येमुळे होणारे दुष्परिणाम टाळता येतील.



Scanned by TapScanner

संदर्भ सूची :


१) साळुंखे आ.ह. (२००३), हिंदु संस्कृती आणि स्त्री, लोकवाङ्मयगृह, मुंबई.

२) चित्रे दिलीप पुरूषोत्तम (२०१०), अर्गा.त्काचे जागतिकीकरण, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.

३) गुप्ता मंजु, गुप्ता सुभाषचंद्र (२००९), भ्रूणहत्या और महिलाएँ, अर्जून पब्लिकेशन हाऊस, नई दिल्ली.

४) सुधा राणी श्रीवास्तव (२०१५), लोकप्रभा भारत में महिलाओंकी वैधानिक स्थिती, कॉमनवेल्थ पब्लिशर्स, नई दिल्ली.

५) गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व निदान तंत्रे लिंग निवडीवर प्रतिबंध कायदा १९९४, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई.

६) शुक्ला मृदुला (२००९), स्त्रियों का घटता अनुपात कारण एवं समाधान, रोशनी पब्लिकेशन, कानपूर.

७) लोकराज्य (२०११), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.

८) दैनिक लोकमत व दै. देशोन्नती.




२५४

Scanned by TapScanner